

सायं.दैनिक बीड **सरकार** ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

संपादक-आदोडे साहस  Evening Daily beedsarkar

शिवसेना महायुती

बीड महाराष्ट्र ■ वर्ष ११ वे ■ अंक २३८ ■ गुरुवार ४ एप्रिल २०२४ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक ५ एप्रिल २०२४ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 11 Issu 238 ■ Thursday 4 April 2024 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-169/2022-2024

# पंकजाताई मुंडे गांभीर्याने घ्या; भावी आमदारकी वाचविण्यासाठी भाजपासह महायुतीचा छुपा छुपीचा खेळ!

## बीड,गेवराई,माजलगाव,केज मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार पिछाडीवर

### स्थानिक नेत्यांचे दुर्लक्ष; मुंडे परिवाराचीच प्रचारात आघाडी

बीड (सरकार): राज्य पातळीवर लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीचे गटबंधन झाले आहे व राज्यात बऱ्याच ठिकाणी महायुतीच्या लोकसभा निवडणुकीची उमेदवारी घोषीत करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात पंकजा गोपीनाथ मुंडे यांची उमेदवारी जाहीर होताच जिल्ह्यामध्ये मोठा आनंदोत्सवात आणि ठिकठिकाणी पंकजाताई मुंडे यांचे स्वागत करून एक प्रकारे मोठा आनंद साजरा करण्यात आला. तर केज दोन तीन मध्यम सभा घेतल्या. गेवराई मतदारसंघात गाठीभेटी झाल्या. माजलगावात कार्यकर्त्यांशी संवाद साधून महायुतीच्या प्रमुख नेत्यांना भेट देऊन बीडमध्ये अनेक कार्यकर्त्यांच्या भेटी झाल्यानंतर महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडेंना अनेक जणांनी मोठे मताधिक्य देऊन निवडून आणण्याचे जाहीरपणे सांगितले. विशेष करून माजलगाव आणि केज मतदारसंघात दाखविण्यात आले. मात्र या छोट्याशा सभेनंतर नंतर केज,बीड,गेवराई,माजलगाव या मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचा प्रचार स्थानिक नेत्यांच्या दुर्लक्षामुळे पिछाडीवर पडला आहे. त्यामुळे भाजपासह पंकजा मुंडे यांनी या गंभीर बाबीची नोंद घेऊन या चार मतदारसंघात महायुतीच्या कार्यकर्त्यांपासून लोक प्रतिनिधीपर्यंत प्रचारासाठी गाठीभेटी घेऊन प्रचार करण्यासाठी गांभीर्याने सांगावे अशी चर्चा होत आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांची उमेदवारी जाहीर होताच भाजपाने व महायुतीच्या नेत्यापासून कार्यकर्त्यांपर्यंत आनंद व्यक्त करण्यात आले व अनेकांनी पत्रकार परिषद घेऊन मोठे मताधिक्य देऊन पंकजा मुंडे यांना निवडून आणण्याचा संकल्प केला. मात्र हा संकल्प अवघ्या काही दिवसात विसरून गेल्याचे चित्र माजलगावात दिसून आले. पंकजा मुंडे यांची माजलगावात भेटी गाठी झाल्यानंतर पुन्हा महायुतीच्या नेत्यासह कार्यकर्त्यांनी प्रचाराकडे दुर्लक्ष केले. अशीच परिस्थिती केज मतदारसंघात गांभीर्याने दिसून आली. मात्र यावर येथील भाजपाचे लोकप्रतिनिधी विशेष करून केज मतदारसंघ हा अनुसूचित जातीसाठी राखीव असून येथील राखीव मतदारसंघातील लोकप्रनिधी प्रचार करत असल्याचे दिसून येत नाही. व चांद्यापासून बांध्यापर्यंत महायुतीचे कार्यकर्ते या लोकप्रतिनिधी सोबत प्रचारालाही दिसून येत नसल्यामुळे मोठी काळजी निर्माण झाली आहे. तर बीडमध्ये मोठ्या नेत्याच्या मार्गदर्शनाखाली प्रचार प्रचार दिसून येत नाही. त्याचबरोबर गेवराई मतदारसंघात तर तेरी भी चुप, मेरी भी चुप असे चित्र दिसून येत आहे. गेवराई मतदारसंघ हा भाजपाचा गड मानल्या जातो. मात्र याच ठिकाणी महायुतीचे उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांचा प्रचार दिसून येत नाही. कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांसमोर प्रश्न निर्माण झाला आहे की कोणत्या नेत्याच्या सूचना, मार्गदर्शन आणि कोणाच्या मार्गदर्शनाखाली प्रश्न, अडीअडचणी सांगायच्या कोणाला असा प्रश्न निर्माण होत असल्याचे बोलले जात आहे. त्याचबरोबर महायुतीचे अनेक नेते दिसून येतात.मात्र पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी महायुतीच्या नेत्यापासून कार्यकर्ते प्रत्यक्षात प्रचाराला दिसून येत नाहीत.त्यामुळे ही गंभीर बाब पंकजा गोपीनाथ मुंडेंनी ओळखावी आणि पक्ष पातळीवर या संदर्भात व आपण स्वत: या चार मतदारसंघातील भाजपासह महायुतीच्या नेत्यापासून कार्यकर्त्यांपंत आणि आमदारापसून ते भाजपाच्या पदाधिकाऱ्यापर्यंत प्रचाराचे गांभीर्य ओळखून तात्काळ कामाला लागावे अशा सूचना दिल्या पाहिजेत अशी चर्चा होत आहे.

## अज्ञातांकडून हनुमान मंदिराच्या मूर्तीची तोडफोड;पोलिसांकडून शांततेचे आवाहन

बीड (सरकार): लिंबागणेश येथील मारोती मंदिरातील मुर्तीची अज्ञाताकडुन तोडफोड केल्याची घटना आज गुरुवारी सकाळी उघडकीस आली आहे. घटनास्थळी पोलिस दाखल होऊन पोलीस प्रशासनाकडून शांततेचे आवाहन करण्यात आले आहे.

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील मध्यवर्ती असलेल्या मारोती मंदिरातील हनुमानाच्या मुर्तीची तोडफोड केल्याचे निदर्शनास आले आहे. दररोज प्रमाणे सकाळी पुजा करण्यासाठी गेलेल्या भाविकांच्या मूर्तीची तोडफोड केल्याचे निदर्शनास आले. दगडीमुर्ती असलेल्या शेंदुरयुक्त मुर्तीची तोडफोड करण्यात आल्याचे आढळून आले. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी तात्काळ नेकनुर पोलिसांना यांची माहिती दिली.यावेळी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, पोलिस



उपनिरीक्षक नितिन गुट्टुवार,लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे.संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यानंतर मारोतीच्या मंदिरात ग्रामस्थांची बैठक घेऊन घटनेविषयी ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधत शांततेचे आवाहन करत चौकशी करून संबंधित प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, कल्याण वाणी, विक्रांत वाणी, अॅड.गणेश वाणी,राजेभाऊ जाधव, नितीन जाधव, रामदास मुळे,विनायक वाणी,रामदास मुळे, महादेव कुदळे,उमेश जोगदंड, गणपत घोलप, सुखदेव वाणी,कचरू निर्मळ,ढवळे उपस्थित होते.

## ऊस तोडणीला मजूर पाठवतो म्हणून ऊसतोड मुकादमाला आठ लाखाला घातला गंडा

परळी (सरकार): ऊस तोडणीसाठी मजूर पुरवतो म्हणून यवतमाळ जिल्ह्यातील एका जणाने परळी तालुक्यातील ऊसतोड मुकदमाला तब्बल आठ लाख रुपयाला गंडा घातल्या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

फिर्यादी बबन सुदाम कदम वय-४९ वर्षे व्यवसाय-ऊस तोड मुकादम रा-नंदागौळ ता- परळी यांनी आरोपी विष्णु उकंडा राठोड वय-२९ वर्ष रा-वनवारला ता-पुसद जि-यवतमाळ याच्याशी करार केला होता.आरोपीने फिर्यादी व साक्षीदाराकडून कारखाण्याला ऊस तोडणीसाठी मजुर पुरवतो असे म्हणुन विश्वासाने ८०००००/रु (आठ लाख रु) घेतले.पैसे घेऊनही ऊस तोडणीसाठी मजुर पुरवले नाही व फिर्यादीचे पैसे वापसही दिले नाही. त्यामुळे फिर्यादी व साक्षीदार यांचा त्याने विश्वासघात केला म्हणून पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे आरोपीविरुद्ध गुरन. कलम-८४/२०२४ कलम-४०६ भादवी प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.पुढील तपास पोह केकाण हे करीत आहेत.

## रिटायर्ड डीन यांनी सहा लाख रुपयांच्या पाण्याच्या टाक्या खरेदीचे आदेश दिले

### टाक्या बसवल्या कुठे कोणालाच पत्ता नाही

अंबाजोगाई (सरकार): अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन बंद का ? तर त्यासाठी लागणारा फंड उपलब्ध नाही पिण्याचे पाणी रुग्ण व नातेवाईकांना मिळत नाही दुसरीकडे पाण्याच्या टाक्याची खरेदी जाता जाता रिटायर्ड डीन यांनी महाविद्यालय विभागासाठी सहा लाख रुपयांची खरेदी केली मग त्या सहा लाखाच्या पाण्याच्या टाक्या आहेत कुठे ? कोणाला थांग पत्ता लागत नसल्याचे समजते रुग्णालय व महाविद्यालय विभागात डीन ऑफिसमध्ये गेली अनेक वर्षापासून कार्यरत असणारा कंत्राटी डोम कावळ्याच्या शिफारशीवरून सेवानिवृत्त होताना डीन यांनी लाखो रुपयांच्या खरेदीचे आदेश दिल्याने या बोगस आदेशाची चौकशी होऊन कार्यवाही अशी जनतेतून मागणी होत आहे

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय सिटीस्कॅन मशिन दुरुस्ती अभावी सहा महिने झाले बंद आहे त्याच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी यांनी ८० लाख रुपयांचा निधी उपलब्ध केला त्यात आणखीन ४० लाख रुपयांची गरज आहे म्हणून आज पावेतो ती मशीन सुरू झाली नाही सिटीस्कॅन मशीन सुरु होणे महत्त्वाचे होते की सहा लाख रुपयांच्या टाक्या खरेदी करणे महत्त्वाचे होते चार महिन्यापासून गोरगरीब रुग्णाचे किती नुकसान झाले त्याचा अंदाज बांधता येणार नाही सिटीस्कॅन मशीन निधी अभावी दुरुस्त होत नाही दुसरीकडे आपण सेवानिवृत्त होत आहोत आपल्याला देणे घेणे नाही येणारा डीन बघेल सिटीस्कॅन मशीन सुरू करायची की नाही या भूमिकेतून तत्कालीन डीन यांनी रुग्णाच्या हितापेक्षा स्वतःचे तसेच कंत्राटदार, कंत्राटी डोमकवळ्याचे हित जोपासत अनावश्यक बाबीवर लाखो रुपये खर्च करत पाण्याच्या टाकीचे खरेदीचे आदेश दिले विद्यमान डीन यांनी सदरील बोगस खरेदी तात्काळ थांबवून तो निधी रुग्णसेवेसाठी वापर करावा अशी जनतेतून मागणी होत आहे.

## माजलगाव तालुक्यात वाळूचे लिलाव झाले की काय ? ;रात्रं आणि दिवस वाळू उपसा सुरू तहसीलदार गप्प का ?








### वाळू माफियांना घाटाचे सातबारा देऊन टाका ? ;शासनाला करोडोचा चुना

**शेख मुजफ्फर । माजलगाव**

माजलगाव तालुक्यात वाळू माफियांची उघडपणे वाळू तस्करी सुरू आहे. यावर नियंत्रण करणारी संपूर्ण शासकीय यंत्रणा कोलमडून पडल्या सारखी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बेलगाम वाळू माफियांनी संपूर्ण गोदाकाठ पोखरून काढण्यास सुरुवात केली आहे. शासकीय लिलाव सुरु असल्यासारखे सर्वच वाळू घाटावर सर्रास उपसा सुरू आहे. परिणामी तालुका महसूलच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे राज्याचा कोट्यावधीचा महसूल लुबाडल्या जात आहे. माजलगाव तालुक्याला गोदामायचे वरदान लाभल्याने या परिसरात वाळूचे मोठमोठी कोठारे आहेत.सादोळा, गंगामसला, छत्रबोरगाव, मोगरा, सांडसचिंचोली, आंबेगाव, शुक्ल तीर्थलिमगाव, मंजरथ, रीदोरी, काळेगाव थडी, नागडगाव, इत्यादी गोदाकाटच्या गावामध्ये

वाळू मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. मागील तीन वर्षापासून शासनाचा लिलाव झालेला नाही. तरीही माजलगाव तालुक्यात सुरू असलेल्या बांधकामा समोर वाळूचे ढिगारे दिसून येत आहेत. तालुक्यातील सर्वच वाळू घाटावरून मेटाडोर, छोटाहत्ती टिप्पर, जीप, मोटरसायकल, ट्रॅक्टर, ट्रक इत्यादी आयपतीनुसार वाहनाचा उपयोग करून वाळूची तस्करी मोठ्या प्रमाणात सुरु आहे. येथील वाळू माफियांनी गोदाकाठ अक्षरशा पोखरून काढण्यास सुरुवात केली आहे. तर या सर्व वाळू चोरीवर नियंत्रण करणाऱ्या शासकीय यंत्रणा कोलमडुन पडल्या आहेत. वाळू चोरीवर नियंत्रण करण्यासाठी महसुलचे निग्रणीपथक असल्याचे समजते. परंतु या पथकाकडून एकाही वाळू तस्करी करणाऱ्या वाहनावर कार्यवाही करण्यात येत नाही. यावरून एकच बाब लक्षात येते की सदरील वाळू चोरीकडे स्थानिक तालुका महसूलचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे. यामुळे राज्य शासनाच्या खनिजावर वाळू माफीया दिवसा ढवळ्या दरोडा टाकल्या जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन वाळू माफियांचे कंबरडे मोडण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिक्रिया सामान्य मधून व्यक्त होत आहे.

## दासखेड येथे जुगाराच्या अड्ड्यावर पाटोदा पोलीसाचा छापा

पाटोदा (सरकार): पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांनी दिनांक ३ एप्रिल २०२४ रोजी गोपनीय माहिती मिळाल्याने अनमोल केदार यांनी आपल्या अधिपत्या खालील गाडे, काटकर, वाघ, जायभाय, काकडे, झल कोळेकर, पठाण स्टाफ यांना सदरची माहिती कळवून पंचासह कारवाई करण्याकरिता तात्काळ घटनास्थळी रवाना करून पाटोदा तालुक्यातील दासखेड येथे नदीच्या बाजूला असलेल्या झाडाखाली जुगाराचा खेळ चालू असताना पाटोदा पोलीस स्टेशन स्टाफने अचानकपणे छापा मारला असता काही इसम चाहूल लागल्यामुळे मोकळ्या रानात पळु लागले असता त्यांचा पाटोदा पोलिसांनी पाठलाग करून पकडले.

सदरच्या ठिकाणी एकूण १२ आरोपी जुगार खेळ पैशावर खेळत असताना मिळून आले सदरच्या कारवाईमध्ये १) पांडुरंग संदीपान कोकाटे वय ५१ वर्ष २) साहेबराव किसन कोकाटे वय ५५ वर्ष ३) अनिल सिताराम कोकाटे वय



६० वर्ष ४) लक्ष्मण भगवानराव मोरे वय ३८ वर्ष ५) दत्तात्रय बन्सीधर कोकाटे वय ४४ वर्ष ६)) सुभाष शांतीलाल वाघीरे वय ५६ वर्ष ७) दत्तात्रय बापुराव कोकाटे वय ४८ वर्ष ८) हरीभाऊ भिमराव कोकाटे वय ५२ वर्ष ९) प्रशांत आणासाहेब कोकाटे वय ४४ वर्ष १०) गणेश मारोती कोकाटे वय ४५ वर्ष ११) रमेश काकासाहेब कोकाटे वय ३१ वर्ष सर्व रा. दासखेड ता. पाटोदा १२) अनिल विठठल बाबर रा. हिंगणी ता. करमाळा जि. सोलापुर यांना ताब्यात घेतले असून बेकायदेशीर रित्या पत्यावर पैसे लावुन स्वतःच्या फायदयासाठी तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना जुगाराचे साहीत्य, रोख ११२४० रुपये व जुगार खेळण्यासाठी येणे जाणे साठी वापरलेल्या चार मोटार सायकल किमत १,९५,००० रुपये असा एकुण २०६,२४० रुपये सह मुद्देमालासह जप्तीची कारवाई करून सदर आरोपीतांविरुद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे पोलीस उपनिरीक्षक माधव नारायण काटकर यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पाटोदा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, मा.अप्पर पोलीस अधीक्षक पांडकर साहेब. मा.उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर,यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार,पोलीस उपनिरीक्षक भागवत गाडे,पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, सहाय्यक फौजदार बाळासाहेब वाघ,पोलीस हवालदार सुनील जायभाय, पोलीस हवालदार संतोष काकडे,पोलिस अंमलदार सचिन कोळेकर व रियाज पठाण यांनी केली असल्यामुळे पाटोदा पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईमुळे दोन नंबर क्षेत्रातील लोकांच्या मनात धडकी भरली आहे.

## माजलगाव धरणातुन कालव्यात पाणी सोडले

**११ गावांना दिलासा**

माजलगाव (सरकार): तालुक्यातील धरणाखाली असलेल्या गावातील पशुधन व नागरिकांना पिण्यासाठी माजलगाव धरणातून कालव्यात पाणी सोडण्यात यावे ही मागणी एकदाची मान्य करण्यात आली असून मंगळवारी सकाळी १०० क्युसेक पाणी कालव्यात सोडण्यात आले. यामुळे जवळपास ११ किलोमीटर अंतरावरील गावांना दिलासा मिळाला आहे.

गेल्या वर्षी अत्यंत कमी पाऊस झाल्यामुळे संपूर्ण पावसाळ्यात धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाली नाही. उलट पावसाळ्यात सुद्धा धरणातून पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत गेली. गेल्या पाच महिन्यात धरणाची पाणी पातळी मृतसाठ्याखाली गेली आहे. तसेच सध्या प्रचंड उन्हाळा असल्याने धरणातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. परंतु नागरिकांची पाण्याची मागणी पाहता काल धरणातून कालव्यात १०० क्युसेक पाणी सोडण्यात आले. यामुळे धरणाखालील ११ किलोमीटर पर्यंत असलेल्या गावांना काही प्रमाणात का होईना दिलासा मिळाला आहे.



# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते फुलचंद कराड यांच्या लिंबोट्यात बुद्ध विहार केंव्हा होणार?

परळी (सरकार): तालुक्यातील बहुतांश गावात बौद्ध समाजासाठी घेण्यात येणारे विविध कार्यक्रमांसाठी बुद्ध विहारे आहेत.परंतु नुकतेच भाजपातून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेलेले शरद पवार गटाचे नेते फुलचंद कराड यांच्या लिंबोट्यात बुद्ध विहार केंव्हा होणार असा सवाल जनतेतून होत आहे.

विविध धार्मिक कार्यक्रम तसेच सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ग्रामीण भागात शासनाच्या वतीने बौद्ध किंवा बहुजन वस्तीत समाज मंदिर बांधून दिले जाते.तालुक्यातील लिंबोटा ही ग्रामपंचायत गेली अनेक वर्षांपासून फुलचंद कराड यांच्या ताब्यात राहिलेली आहे.किंवा त्यांचें वर्चस्व आहे.परंतू गावातील बौद्ध वस्ती,इतर मागासवर्गीयांचा अजुनही विकास झालेला नाही.गावात बुद्ध विहार लवकरात लवकर करावे अशी गेल्या अनेक वर्षांपासून समाजाची महत्वपूर्ण मागणी आहे.आता ती केंव्हा पूर्ण होणार हे स्पष्ट दिसत नाही.

## तुळजाभवानी अर्बन'ची गगनभरारी!
## मार्च २०२४ अखेर संस्थेकडे ६०१ कोटींच्या ठेवी

माजलगाव (सरकार): सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या तुळजाभवानी अर्बनने ३१ मार्च २०२४ अखेर ६०१ कोटी रूपये ठेवींचा टप्पा यशस्वी केला आहे. हे अभूतपूर्व यश तुळजाभवानी अर्बनचे ठेवीदार, सभासद, खातेदार, ग्राहक आणि हितचिंतकांच्या विश्वासामुळे शक्य झाले आहे, अशी माहिती तुळजाभवानी अर्बनचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी दिली आहे.



बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीचा मानबिंदू ठरलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.माजलगाव या संस्थेने मोठी गगनभरारी घेतली आहे. ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत ६०१ कोटी ३९ लाख रूपयांच्या ठेवींचा टप्पा यशस्वी करून पुन्हा ग्राहकांमध्ये विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब केले आहे. संस्थेचा प्रगतीचा आलेख पाहता कर्ज वितरण ३८३ कोटी गुंतवणूक २७८ कोटी २५ लाख, एन.पी.ए.ग्रॉस ७ टक्के नेट २.९७ टक्के तर निव्वळ नफा १८ कोटी ६२ लाख यात स्वनिधी ५४ कोटी ३४ लाख आहे, अशीही माहिती तुळजाभवानी अर्बनच्या व्यवस्थापनाने दिलेली आहे. सहकार क्षेत्रात वेगळी ओळख आणि प्रगतीचा नवा उच्चांक गाठण्यास तुळजाभवानी अर्बन परिवार यशस्वी झाला आहे, याचे संपूर्ण श्रेय संस्थेचे ठेवीदार, ग्राहक, सभासद आणि हितचिंतकांच्या असलेल्या विश्वासामुळे हे शक्य झाले, असे चेअरमन चंद्रकांत शेजुळ म्हणाले.

३१ मार्च २०२४ ताळेबंदाबद्दल चंद्रकांत शेजुळ म्हणाले, सद्यपरिस्थितीत अनपेक्षितपणे तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटमध्ये ठेवलेल्या ठेवी पाहता आणि मिळालेला नफ्याचा विचार करता सभासदांनी दाखवलेला हा विश्वास आहे. आगामी काळातही ग्राहक आणि सभासदांच्या हितासाठी तत्पर राहू, संस्थेच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या सभासदांच्या विश्वासाला सदैव पात्र राहू, अशी ग्वाही चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी दिली. सहकार क्षेत्रातील तुळजाभवानी अर्बनच्या यशात ग्राहक, सभासदाप्रमाणेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शहाजी शेजुळ, सर्व संचालक मंडळ, कोअर टीमचे सदस्य आणि सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे योगदान आहे. तुळजाभवानी अर्बनची सक्षम टीम आणि तत्पर अधिकाऱ्यांमुळे संस्था गगनभरारी घेत आहे.

## गती शक्ती पोर्टलमुळे जिल्ह्यातील पायाभूत नियोजनाचे प्रश्न सुटतील: जिल्हाधिकारी मुधोळ-मुंडे

बीड (सरकार): प्रधानमंत्री गतिशक्ती पोर्टलमुळे बीड जिल्ह्यातील नियोजनाशी संबंधित मूलभूत प्रश्न सुटतील आणि रिमोट सेन्सिंग आणि जी.आय. एस. वर आधारित तंत्राच्या साहाय्याने विकासाचा आराखडा तयार करण्यात येईल, त्यामुळे सर्वच विभागातील *कार्यालय* आणि प्रमुखांनी तसेच त्या त्या कार्यालयातील तंत्रस्नेही कर्मचाऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा उपयोग करावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी गतिशक्ती पोर्टलशी संबंधित कार्यशाळाच्या उद्घाटनाप्रसंगी केले.



आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात बीड जिल्ह्याचे पालक शास्त्रज्ञ तसेच *सहयोगी* शास्त्रज्ञ डॉक्टर प्रशांत राजनकर यांनी गतिशक्ती पोर्टलची मदत हे जिल्ह्याच्या नियोजनाची निगडित कशी आहे याचे संगणीकृत सादरीकरणाच्या माध्यमातून दाखविले.

यावेळी जिल्हाधिकारी दीपा मुधळ मुंडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके तसेच सर्व विभागातील कार्यालयीन प्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पुढे म्हणाल्या गती शक्ती पोर्टलच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील शासकीय योजनांची नीट अंमलबजावणी व्हावी यासाठी उपयोग होऊ शकतो. आजचे हे प्रशिक्षण प्राथमिक स्तरावर असले तरी भविष्यात सर्वच विभागातील कार्यालय प्रमुख आणि त्या त्या विभागातील तंत्रस्नेही कर्मचाऱ्यांनी यात प्रशिक्षित होऊन आपल्या कामाला स्मार्टवर्क कसे द्यावे याबद्दल विचार करावाच लागणार आहे. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग एप्लीकेशन सेंटरचे सहयोगी शास्त्रज्ञ तसेच बीड जिल्ह्याचे पालक शास्त्रज्ञ डॉ. राजनकर यांनी आज गतिशक्ती वेब पोर्टल मध्ये रिमोट सेन्सिंग आणि भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस ) Geographic Information System) या माध्यमातून माहिती गोळा करून ती माहिती गतिशक्ती या वेब पोर्टल मध्ये संग्रहित करून ठेवतात. जेणेकरून ही माहिती एखाद्या ठिकाणचे नियोजन करतेवेळी पूर्वतयारी आणि प्रकल्पाच्या नंतर झालेला विकास याची संपूर्ण माहिती इथून घेता येऊ शकते. एखाद्या प्रकल्पात प्रकल्पग्रस्ताची गेलेली नेमकी जमीन आणि त्या बदल्यात शासनाने दिलेला मोबदला एकदा दिल्यावर पुन्हा प्रकल्पग्रस्ताने जर मोबदला मागण्याचा प्रयत्न केला तर या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तसे करता येणार नाही यामध्ये शासनाचा आणि जनतेचा दोघांचाही फायदा होणार असल्याचे राजनकर यांनी यावेळी सांगितले. केंद्र शासनाचे १६ मंत्रालय मिळून गतिशक्ती पोर्टल तयार करण्यात आलेले आहे. या एका संकेतस्थळावरून विविध मंत्रालयातील असणाऱ्या विविध परवानेच्या मंजुरीचे काम सहज सोप्या पद्धतीने होत असते अशी माहितीही राजनकर यांनी यावेळी दिली. झच् गति शक्ती - नॅशनल मास्टर प्लॅन फॉर मल्टी-मॉडल कनेक्टिव्हिटी लाँच केली, मूलत: रेल्वे आणि रोडवेसह १६ मंत्रालयांना एकत्र आणण्यासाठी आणि पायाभूत सुविधा कनेक्टिव्हिटी प्रकल्पांच्या समन्वित अंमलबजावणीसाठी एक डिजिटल व्यासपीठ.

लोकांच्या, वस्तू आणि सेवांच्या वाहतुकीच्या एका मार्गातून दुसऱ्या मार्गावर जाण्यासाठी कनेक्टिव्हिटी. हे पायाभूत सुविधांच्या शेवटच्या माईलची कनेक्टिव्हिटी सुलभ करेल आणि लोकांसाठी प्रवासाचा वेळ देखील कमी करीत असल्याचे संयोगी शास्त्रज्ञ राजनकर यांनी त्यावेळी सांगितले.

प्रथम सत्र जिल्हा नियोजन समितीमध्ये झाले असून दुसऱ्या सत्राचे प्रात्यक्षिक हे शासकीय औद्योगिक तंत्रनिकेतन संस्था येथे संगणकावर दाखविण्यात आले.

## पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ खा. प्रितमताई मुंडे यांच्या बर्दापूर, राडी गटात भेटीगाठी
### नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पंकजाताईंना विक्रमी मताधिक्य देणारा





अंबाजोगाई (सरकार): भाजप महायुतीच्या उमेदवार तथा भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ खा. प्रितमताई मुंडे यांनी बर्दापूर आणि राडी जिल्हा परिषद गटातील नागरिकांना भेटून त्यांच्याशी संवाद साधला. ग्रामीण भागातील तांडे, वाड्या-वस्त्यांचा शहरातील उच्चभ्रू वस्त्यांप्रमाणे विकास करणाऱ्या विकासाभिमुख नेतृत्वाला बहुमताने लोकसभेत पाठवण्यासाठी मतदानरुपी आशीर्वाद दया असे आवाहन खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांनी याप्रसंगी केले.

पंकजाताई मुंडे यांनी राज्य सरकारच्या माध्यमातून बीड जिल्ह्यासाठी अभूतपूर्व विकास निधी आणला होता, आता पुन्हा एकदा बीड जिल्ह्याच्या अपेक्षा उंचावल्या आहेत, बीडकरांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण व सर्वसमावेशक विकासाला गती देण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना संसदेत पाठवायच आहे, याकरिता एकजुटीने आपल्या सर्वांचे आशीर्वाद पंकजाताईंच्या पाठीशी उभे राहतील, पंकजाताईंना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, हा प्रतिसाद विक्रमी मताधिक्य देणारा आहे असा विश्वास याप्रसंगी खा. प्रितमताई मुंडे यांनी व्यक्त केला. भाजपचे अंबाजोगाई तालुका अध्यक्ष अच्युत बापू गंगणे,अविनाश मोरे, गणेश कराड,श्यामराव आपेट,बिभीषन फड, विलास बापू मोरे, महादेव फड,विकास मोरे,सिद्धू मोरे, चिंचोळे बप्पा, सचिन फड, उत्तम जांभळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. दरम्यान दौरा आटोपून परळीकडे जाताना खा.प्रितमताई मुंडे यांनी सायगाव येथील प्रसिद्ध हजरत सय्यद सादिक अली शाह हुसेन दर्गाचे दर्शन घेतले.

## ओबीसी संकटात असतांना ताईसाहेब कुठं होत्या?
### बीड लोकसभेसाठी सक्षम उमेदवार देणार-प्रा.टी.पी.मुंडे

परळी (सरकार): ओबीसी संकटात असतांना, ओबीसी आरक्षणाला धक्का लागत असतांना स्वतंला ओबीसी नेत्या म्हणवून घेणाऱ्या पंकजाताई मुंडे तेंव्हा कुठे होत्या असा सवाल ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्राध्यापक टी .पी.मुंडे यांनी केला .बीड लोकसभा २०२४ निवडणुकीसाठी ओबीसीचा सक्षम उमेदवार देणार असल्याचे यावेळी प्रा .टी .पी .मुंडे यांनी जाहीर केले .ते परळी येथील औद्योगिक वसाहतीत ओबीसी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते.



यावेळी पुढे बोलताना प्रा .टी.पी.मुंडे म्हणाले की ,महाराष्ट्रामध्ये ओबीसी समाजाची प्रचंड ताकद आहे .भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून ओबीसीला आरक्षण दिले .त्यामुळे त्यांचा विकास होत आहे .परंतु ओबीसींचे आरक्षण धोक्यात आले तर ओबीसीचा विकास खुंटला जाईल. ओबीसी समाजाच्या मुलाबाळांच्या शिक्षण आणि नोकऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे.

महाराष्ट्रात ओबीसी समाजाचे २१ मेळावे घेण्यात आले.प्रत्येक मेळाव्यात लाखोंचा जनसमुदाय उपस्थित होता.तेंव्हा सगळ्यांचेच मत निघाले की ओबीसींचा स्वतंत्र पक्ष असावा म्हणून ओबीसींचे नेते प्रकाश अण्णा शेंडगे व आम्ही सर्वांनी मिळून ओबीसी बहुजन पार्टीची स्थापना केली.सरकारने आमच्या ताटातला घास काढून घेण्याचा प्रयत्न केला.त्यांना ओबीसी समाज धडा शिकविल्या शिवाय राहणार नाही. याप्रसंगी प्रा.टी.पी.मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघासाठी कुणाला उभे करायचे की मी उभा राहू याविषयी उपस्थितांची मते जाणून घेतली.येत्या चार दिवसांत बीड लोकसभा मतदारसंघासाठी ओबीसी बहुजन पार्टीचा उमेदवार जाहीर करु असेही प्रा.टी.पी.मुंडे म्हणाले.या मेळाव्यास प्रचंड गर्दी होती.यावेळी मराठवाडा विभागातील पदाधिकारी यांना प्रा.टी.पी.मुंडे यांनी नियुक्ती पत्र दिले.

## रमज़ान परिचय व रोज़ा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन

बीड (सरकार):शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात रमज़ान परिचय व रोज़ा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार दिनांक ५ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळी ०५:३० वाजता आयोजित करण्यात आला असून महिलांसाठी बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

पवित्र रमज़ान महिन्याच्या शुभ मुहूर्तावर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने बीड शहरातील दोन्ही समाजातर्फे रोज़ा इफ्तार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ज्यामध्ये सर्व समाजातील लोकांना आमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील प्रसिद्ध इस्लामी विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक, जमाअत ए इस्लामी हिंद महाराष्ट्रच्या सदिच्छा विभागाचे सचिव डॉ. सय्यद रफिक पारनेरकर यांचे रमज़ान परिचय या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. ज्यामध्ये रमज़ान, उपवासाचा उद्देश, कुरआनचा संदेश मराठी भाषेतील महत्त्वाची माहिती देण्यात येणार आहे. व्याख्यानानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनच्या मैदानात रोज़ा इफ्तार कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व समाजातील बंधू-भगिनींनी आपला मौल्यवान वेळ काढून या विशेष कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड, सावित्री-फातेमा सद्भावना मंच जमाअत ए इस्लामी हिंद बीड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन मित्र मंडळ बीडकडून करण्यात आले असून महिलांसाठी बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

## येत्या सेट परीक्षेत एसईबीसी आरक्षणाचा समावेश करा!

बीड (सरकार): स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)ने येत्या सेट परीक्षेत एसईबीसी आरक्षणाचा समावेश करण्याची मागणी केली आहे. त्यासाठी एसएफआय महाराष्ट्र राज्य कमिटीने मा. प्रबंधक, राज्य पात्रता परीक्षा (एसईटी) यांना निवेदन पाठवले आहे.

एसएफआयने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने दिनांक ७ एप्रिल २०२४ रोजी राज्य पात्रता चाचणीचे (सेट) आयोजन करण्यात आले आहे. राज्यात दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) आरक्षण अधिनियम २०२४ लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७ फेब्रुवारी २०२४च्या शासन निर्णयानुसार सदरील अधिनियम लागू झाल्यापासून राबविण्यात येणार्या शासकीय / निमशासकीय भरती प्रक्रियेत व प्रवेश प्रक्रियेत संबंधित आस्थापनांनी बिंदूनामावलीत आवश्यक ते बदल करून १० टक्के पदे/जागा एसईबीसी प्रवर्गासाठी राखीव ठेवण्याचे सुचविण्यात आले आहे. वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने एसईबीसी प्रवर्गात मोडणार्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, म्हणून आवश्यक ती कार्यवाही करावी. राज्य पात्रता चाचणीसाठी (सेट) आवेदन केलेल्या विद्यार्थ्यांना आपला प्रवर्ग बदलण्याची संधी द्यावी. एसईबीसी आरक्षण समावेशाची कार्यवाही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणार्या पेट परीक्षेत तसेच चालू असलेल्या १११ प्राध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेसाठी लागू केली आहे.

**एसएफआयची मागणी**

म्हणून राज्य पात्रता चाचणीसाठी (सेट) प्रवर्ग बदलण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी, राज्य पात्रता चाचणीत (सेट) एसईबीसी आरक्षण लागू करावे. अशी मागणी एसएफआयने केली आहे. निवेदनावर एसएफआयचे राज्य अध्यक्ष सोमनाथ निर्मळ आणि राज्य सचिव रोहिदास जाधव यांच्या सह्या आहेत.

## नारायणगड परिसरात ९०० एकर मध्ये होणाऱ्या ऐतिहासिक सभेच्या अनुषंगाने शुक्रवारी पूर्वनियोजन बैठकीचे आयोजन

बीड (सरकार): गेल्या आठ महिन्यापासून मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात मनोज जरांगे पाटील दिवसाची रात्र करून समाजासाठी झगडत असताना दुसरीकडे मात्र राज्य शासन मराठा समाजाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे परत एकदा मराठ्यांची एकजूट सरकारला दाखवण्यासाठी बीड जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या श्री क्षेत्र नारायण गड या ठिकाणी तब्बल ९०० एकर मध्ये मनोज जरांगे पाटील यांची जाहीर सभा होणार आहे. याच अनुषंगाने शुक्रवारी (ता. ०५) दुपारी १२:०० वाजता पूर्वनियोजन बैठकीचे आयोजन श्री क्षेत्र नारायण गड या ठिकाणी करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या बैठकीला स्वतः मनोज जारंगे पाटील उपस्थित राहणार आहेत. बैठक संपल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांची पत्रकार परिषदेही होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. तरी या बैठकीला जिल्हाभरातील सकल मराठा समाजाने उपस्थित राहावे असे आवाहन सुद्धा आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

बीड (सरकार): डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदरील स्पर्धा बीड शहरातील तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालयात रविवार (दि.७) एप्रिल रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत होणार आहे.



या स्पर्धेत आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड यांच्याकडून करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये जयभीम उत्सव आयोजित करण्यात आला आहे. सदरील महोत्सव १ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत साजरा होतो आहे. त्या अनुषंगाने महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत गौतम बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज, छ.शाहु महाराज, डा.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा फुले, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे, राजमाता जिजाऊ, माता रमाई,अहिल्यादेवी होळकर, क्रांती ज्योती सावित्रीमाई यांच्यासह आदी महामानवांच्या जीवनावर प्रश्न विचारले जाणार आहेत.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)